Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# गुरुर्ब्रह्मा

27 May 2011, 0036 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात मेंटॉरिंग अर्थात एखाद्या जाणत्या नेत्याने, व्यवस्थापकाने इतर उमेदवारांना, नवीन सहका ऱ्यांना घडवण्याची प्रक्रिया महत्त्वाची ठरली आहे. अनेक जागतिक दर्जाच्या कंपन्यांमध्ये चीफ मेंटॉर असे पदच पाहायला मिळते. मेंटॉर म्हणजे गुरू आयुष्यात प्रत्येक वळणावर गरजेचा असतो. तुम्ही उद्योग व्यवसायात असा किंवा राजकारणात किंवा तुमच्या वैयक्तिक जीवनातही मेंटॉर तुम्हाला योग्य मार्गदर्शन करतो ज्यामुळे तुमचे श्रम, बुद्धी, पैसा, वेळ वाया जात नाही. आता रामदासांच्या शिकवणुकीचा परिचय असूनही मी ही गोष्ट विसरलो आणि स्वत:चे पैसे विनाकारण खर्च करून बसलो. आमच्या तुळापूरच्या शेतात दाक्षाची लागवड सुरू केली तेव्हाची गोष्ट. एकदा शेताची पाहाणी करायला गेलो असताना उत्तम प्रतीच्या दाक्षांनी लगडलेल्या त्या शेतातील एक गोष्ट मला खटकली, वेलींच्या मांडवाखाली पाला पाचोळा, गवत-काड्या, दगड-माती पसरलेली होती. मला वाटले शेत झाले म्हणून काय झाले? घराच्या अंगणासारखे तेही स्वच्छ असावे. मी तात्काळ आमच्या शेतावरच्या गड्याला तंबी दिली आणि लागतील तितकी माणसे लावून शेत एकदम स्वच्छ करायला सांगितले. तो बिचारा हुकुमाचा धनी, त्याने आणखी गडी लावून शेत एकदम चकाचक साफ केले. दाक्षांचा सीझन संपल्यावर हिशेब केला तेव्हा तर जमेच्या बाजूला ७५००० होते, पण शेत स्वच्छ करायला ९०००० खर्च आला होता. आता शेतीच्या बाबतीत मी कोणा अनुभवी व्यक्तीचा सल्ला, मार्गदर्शन घेतले असते तर माझा हा अक्कलखाती खर्च टळला असता. मेंटॉर नसल्याचा फटका मला असा बसला.

समर्थ रामदासांनी मेंटॉरिंगबाबत सुंदर विवेचन सर्वज्ञसंग- निरुपण या समासात केले आहे. ज्ञानी नेतृत्वाकडून कसे आणि काय शिकावे हे सांगताना समर्थ म्हणतात,

जाणत्याचे जाणावे प्रसंग। जाणत्याचे घ्यावे रंग।

जाणत्याचे स्फूर्तीचें तरंग। अभ्यासावे।।

जाणत्याचा साक्षेप घ्यावा। जाणत्याचा तर्क जाणावा।

जाणत्याचा उल्लेख समजावा। न बोलतांचि।।

जाणत्याचे धूर्तपण। जाणत्याचे राजकारण।

जाणत्याचे निरुपण। ऐकत जावे।।

जाणत्याची तिक्ष्णता। जाणत्याची सहिष्णुता।

जाणत्याची उदारता। समजून घ्यावी।।

गुरूकडून म्हणजे मेंटॉरकडून घडण्याची जी क्रिया असते ती शिष्याकडूनही व्हावी लागते. ज्ञानी माणसाचे निरीक्षण करून, त्याचे विचार ऐकून, त्याचे राजकारण पाहून, त्याने केलेले कृत्य पाहून, एखाद्या विषयावरचे त्याचे मत जाणून अनेक गोष्टी शिकता येतात. गुरूच्या प्रत्यक्ष शिकवण्याने कसा फरक पडतो हे मी पं. गणपती भट यांच्या कर्नाटकातील गुरूकुलात बघितले होते. पंडितजींच्या या गुरूकुलात नियमित राहू शकणाऱ्या, पण त्यांच्याकडे शिकायची इच्छा असलेल्या काही जणांना निरगुडकर फाऊंडेशनतफेर् तिकडे नेले होते. त्यातील काही जण पंडितजींच्या सीडी ऐकून शिकत होते. पण त्यांचे गाणे आणि प्रत्यक्ष पंडितजींकडे शिकणाऱ्यांचे गाणे ऐकल्यावर त्यातला फरक पाहून गुरूच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाचे महत्त्व लगेच जाणवत होते.

कोणत्याही उद्योगाच्या, व्यवसायाच्या, संस्थेच्या यशामागे एकच प्रभावी नेता पुरेसा नसतो, त्यासाठी संस्थेच्या सर्व स्तरांवर आणि सर्व काळासाठी नेत्यांची शृंखला तयार होणे गरजेचे असते. त्यासाठीच अनुभवी, ज्ञानी नेतृत्वाकडून मेंटॉरिंग होणे आवश्यक असते. समर्थ रामदासांनी नेतृत्व निर्मितीची ही प्रक्रिया सांगताना म्हटले आहे...

महंते महंत करावे। युक्तिबुद्धीने भरावे।

जाणते करून विखरावे। नाना देसी।।

प्रभावी नेत्याने आपल्यासारखेच नेते निर्माण करावेत आणि त्यांना वेगवेगळया कार्यासाठी विविध ठिकाणी पाठवून आपल्या कार्याचा विस्तार करावा. आधुनिक जगात 'कोकाकोला'सारख्या कंपनीने विस्तारासाठी हीच नीती वापरल्याचे दिसून

येते.

समर्थ रामदासांच्या विवेचनातला महत्त्वाचा मुद्दा असा की नेतृत्व हे जन्मापेक्षा प्रशिक्षणानेही तयार होऊ शकते असा काळाच्या पुढचा विचार प्रभावीपणे मांडला आणि आपल्या शिकवणुकीतून असे अनेक महंत म्हणजे नेते/ व्यवस्थापक तयार करून दाखविले.

- डॉ. सुधीर निरगुडकर

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768